## Newspaper: Maharashtra Times

## Article Date: 11th October 2018

## Article regarding Career Pe Charcha organised by Career Guidance Forum

# करिअर पे चर्चा!



रोहित पाटील, पोदार कॉलेज

दहावीची परीक्षा संपली की प्रत्येक विद्यार्थ्यांपुढे प्रश्न असतो आणि तो म्हणजे पुढे करिअरचं काय? आपण निवडलेला मार्ग योग्य आहे की नाही याबाबत काही विद्यार्थी साशंक असतात. म्हणूनच करिअर मार्गदर्शन करण्यासाठी पोदार कॉलेजच्या करिअर गाइडन्स फोरमनं 'करिअर पे चर्चा' यावर दोन दिवसीय सेमिनार आणि समूह चर्चेचं आयोजन केलं होतं.

समूह चर्चेमध्ये शिक्षकांबरोबरच कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीसुद्धा विविध क्षेत्रातील करिअरची माहिती इतर विद्यार्थ्यांना दिली. या चर्चेमध्ये सीए, सीएस, सीएमए याबरोबरच डिजिटल वर्ल्ड, फोटोग्राफी, फाइन आर्ट्स यासारख्या निरनिराळ्या क्षेत्रांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. कॉलेजच्या उपप्राचार्य प्रा. कविता जाजू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. दुसऱ्या दिवशी 'करिअर पे चर्चा' या विषयावरती एक सेमिनार भरवण्यात आलं. या सेमिनारचे प्रमुख अतिथी सीए हृदयेश पंखानिया होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रांमधील वेगवेगळ्या करिअरची माहिती दिली.